# अमेरिकेचा संगीत दौरा

**अरविंद परांजपे**

*"आम्ही किती छोट्या विश्वात रहातोय हे आम्हाला तुमचा कार्यक्रम बघून समजले. तुमच्या अनोख्या संगीताने आमचे डोळे उघडले आणि समजले की या जगात ऐकायला आणि बघायला किती चांगल्या गोष्टी आहेत. तुमच्या वाद्यांचे प्रात्यक्षिक बघणे हा आमचा बहुमान आहे. कदाचित पुढे कधीही न मिळू शकणारा तुम्ही दिलेला हा सांस्कृतिक अनुभव आमच्या विद्यार्थ्यांच्या दीर्घ काळ लक्षात राहील." जेसन कोक्स, कोरल डायरेक्टर, सदर्न वेन स्कूल, आणि टॅमी किल, मुख्याध्यापक, स्प्रिंग क्रीक मिडल स्कूल.*

*"तुमचे संगीत किती प्रगल्भ आणि समृद्ध आहे." - डेबोरा स्टोरी, पियानो वादक आणि शिक्षक*

*"आजची संध्याकाळ अविस्मरणीय! सतार-तबला संगीताची जादू अनुभवली, मन प्रसन्न झाले." मैफिलीला आलेले प्रेक्षक*

*"तुम्ही आपल्या महान देशाचे सांस्कृतिक राजदूत आहात." एक रसिक*

एप्रिल- मे २०२४ मध्ये सतारवादक ज्योती ठकार आणि मी अमेरिकेत केलेल्या मैफिलीना आणि संगीत प्रात्यक्षिकांना तेथील रसिकांनी आणि शाळेतील संगीत शिक्षकांनी असा मनापासून प्रतिसाद दिला. भरघोस दाद देणारे रसिक आणि प्रेमाने आमचे स्वागत करणारी मित्रमंडळी यांच्या संयोगामुळे आमची ही दोन महिन्यांची संगीत सफर संस्मरणीय झाली. खरंच, महान परंपरा असलेले आपले संगीत हे केवळ करमणुकीकरता नाही तर संवेदनाशील मनाला स्पर्श करणारे आणि शांततेचा अनुभव देणारेही आहे. पं. रवीशंकरांसारख्या पूर्वसूरींनी अमेरिकेत भारतीय संगीत आणि सतार लोकप्रिय केली, त्याचा फायदा आमच्या सारख्या कलाकारांना होतो आहे. देशातील अनेक कलाकार सातत्याने तिथे जात आहेत. अमेरिकन विद्यापीठांमध्ये हिंदुस्तानी संगीत शिकवले जाते. कित्येक विदेशी नागरिक ऑफलाइन/ऑनलाइन पद्धतीने सतार, सरोद, तबला, गायन आणि नृत्य शिकत आहेत आणि कलाकारही झाले आहेत.


मी आणि ज्योती ठकार यांनी यापूर्वी परदेशात संगीत कार्यक्रम केलेले असल्याने आमच्या मनात अमेरिकेचाही दौरा करायची इच्छा होती. अमेरिकेहून दर वर्षी भारतात येणारी मित्र मंडळीबरोबरच्या गप्पांमधून अमेरिकेविषयी उत्सुकता वाढत होती आणि तो योगही आला. ज्योती ठकार यांच्या विद्यार्थ्यांच्या मदतीने आमचा दौरा निश्चित होऊन आम्ही जायचे ठरवले. पण सुरवातीला आलेली कार्यक्रमांची निमंत्रणे रद्द झाली, तरी आम्ही प्रयत्न सोडले नाहीत. अमेरिकेत

अनेक वर्षे रहात असलेल्या आमच्या मित्र आणि नातेवाईक मंडळीना आवाहन केले, त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. ज्योती ठकार- सतारवादक आणि तबला साथीदार, निवेदक आणि व्यवस्थापक अशा तिहेरी भूमिकेत मी, अशी टीम सिद्ध झाली. या सर्वांच्या सहकार्यामुळे आमचा दौरा कसं यशस्वी झाला त्याविषयीचे हे निवेदन आहे. अनेक गुणी, मातब्बर आणि थोर कलाकार परदेशांत कार्यक्रम करत असतात. त्यामुळे आम्ही काही विशेष केले आहे असे मला अजिबात म्हणायचे नाही. तर मुलांना एखादी गोष्ट पहिल्यांदाच बघितल्यावर/केल्यावर आलेली मजा जशी इतरांना जशी सांगाविशी वाटते तशी माझी भूमिका आहे. याची नोंद घेऊन हे वर्णन वाचावे ही विनंती.

**आधीचे परदेश दौरे**

परदेशांत जाऊन संगीत कार्यक्रम सादर करण्याचा अनुभव आमच्याकडे होता. २००४ मध्ये सिंगापूरला ज्योती ठकार यांच्याबरोबर सतारवादनाची साथ करण्यासाठी मी गेलो तो माझा पहिला परदेश दौरा होता. त्यानंतर 'कलापिनी' या संस्थेतर्फे दुबई-अबुधाबीच्या महाराष्ट्र मंडळाच्या आमंत्रणांवरून आमची ७ जणांची टीम गेली होती. आम्ही त्या दौऱ्यात ''गद्य नाटक, सुगम संगीत आणि नाट्य संगीत' अशा तीन विधांचा समावेश असलेला 'त्रिधा' हा कार्यक्रम सादर केला होता. त्याचे नियोजन, व्यवस्थापन आणि तबला साथ अशी माझी जबाबदारी होती. तिथे माझा मित्र व संगीत रसिक जाणकार सीए श्रीरंग कुलकर्णी यांच्याकडे आम्ही राहिलो होतो. आमचे कार्यक्रम तेथील रसिकांच्या चांगलेच पसंतीस पडले होते. त्यानंतर इंग्लंड, स्कॉटलंड (३ वेळा), फ्रांस, जर्मनी आणि ऑस्ट्रेलिया (४ वेळा) आणि न्यूझीलंड या देशांमध्ये मी व ज्योती ठकार सतार-तबला वादनाच्या कार्यक्रमाकरता जाऊन आलो होतो. त्यातले काही कार्यक्रम तेथील महाराष्ट मंडळांनी आयोजित केले होते. तर पॅरिस आणि बर्लिन येथे फक्त विदेशी नागरिकांसमोर केले होते. 'आपल्या अभिजात संगीतात सर्व वयाच्या रसिकांना खिळवून ठेवण्याचे सामर्थ्य आहे' हे मंडळाच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा केल्यानंतर त्यांना पटले असल्याने त्यांनी आम्हाला निमंत्रित केले होते. आमचे याआधीचे दौरे चार-पाच आठवडयाचे (साधारण दहा-बारा कार्यक्रम) होते. पण अमेरिकेत कार्यक्रम करण्याची जास्त संधी असल्याने असल्याने तेथे दोन महिन्यांचे नियोजन केले. तरी फक्त ईस्ट कोस्टचाच (पूर्व अमेरिका) विचार केला आणि वेस्ट कोस्टचा (कॅलिफोर्नियाची बाजू) दौरा नंतर करावा असं ठरवलं. अमेरिकेतल्या अनेक शहरात कार्यक्रमांची जरी शक्यता असली तरी दौरा करणाऱ्या कलाकारांचे प्रमाणही जास्त असल्याने एकाच गावात एका दिवशी दोन-तीन कार्यक्रमही असतात. अर्थातच मग मर्यादित संख्येने असलेले रसिक दोन-तीन ठिकाणी विभागले जातात

## आर्टिस्ट व्हिसा (P3)




अमेरिकेत संगीत कार्यक्रम करून आलेल्या कलाकारांकडून तेथील कार्यक्रम चांगले होतात आणि रसिकांची दाद मिळते असे अनुभव ऐकले होते. आम्हालाही तसाच अनुभव आला. तेथे कार्यक्रम करण्यासाठी परफॉर्मन्स विसा म्हणजे P3 व्हिसा आवश्यक असतो. (आमच्याकडे तर प्रवासी व्हिसा (B1/B2) सुद्धा नव्हता.) त्यामुळे आर्टिस्ट व्हिसा (P3) करता काय करावे लागते याची माहिती वेबसाईटस, अमेरिकेत अनेक दौरे आयोजित केलेले तबला वादक संजय देशपांडे आणि विसा कन्सलटंट महेश अभ्यंकर यांच्याकडून घेतली आणि मी कामाला लागलो. P3 व्हिसा काढण्याची प्रक्रिया H1B व्हिसाच्या धर्तीवर आहे. ती क्लिष्ट आणि खर्चीक असली तरी पर्याय नव्हता. त्यानुसार अमेरिकेतील एका कंपनीने कलाकार म्हणून आम्हाला स्पॉन्सर करावे लागते. गुरू पं. रामदास पळसुले यानी सुचवल्यानुसार विनय देशमुख यांच्याशी संपर्क साधला. त्यांच्या सोहिनी कार्पोरेशन या अमेरिकेतल्या कंपनीने आम्हाला कलाकार म्हणून स्पॉन्सर करण्याचे मान्य केले. त्यानंतर आम्ही अमेरिकेत एक इमिग्रेशन वकिल नेमले. त्यांनी अमेरिकन सरकारच्या इमिग्रेशन विभागाकडे पिटिशन दाखल केला. त्या सोबत आम्ही कलाकार व स्पॉन्सर कंपनी यांच्यातला करारनामा, आमचे परिचय, आमच्या कार्यक्रमांचे वर्तमानपत्रातील वृत्तान्त, आधीच्या कार्यक्रमाच्या यू ट्यूब लिंक्स, मान्यवर संगीततज्ञांची शिफारस पत्रे, अमेरिकेतील कार्यक्रम आयोजित करणाऱ्या संयोजकांची निमंत्रणे, असे सर्व त्या सोबत अपलोड केले. त्यानंतर अमेरिकेच्या व्हिसा ऑफिस मधून व्हिसा मिळाल्यानंतर मुंबई येथील अमेरिकेन वकिलातीत आमची बायोमेट्रिक माहिती घेतली आणि नंतर मुलाखत होऊन व्हिसा स्टॅम्प झाला. त्यानंतर आम्ही १० एप्रिल २०२४ या दिवशीची मुंबई-हयुस्टन विमानाची तिकिटे काढली. हे सर्व काम चालू असताना अमेरिकेतील आमच्या ओळखीच्या मित्रमंडळी आणि नातेवाईक यांच्याशी संपर्क मोहीम चालूच होती. ज्यांना संगीत विषयात रस आहे आणि आपले कार्यक्रम जे ठेवू शकतील त्यांच्याशी आम्ही बोलणी सुरू केली. मला यात चांगलं यश मिळालं आणि बघता बघता आमचे हयुस्टन, अटलांटा, कॅरि (नॉर्थ कॅरोलिना), मेरीलँड, व्हर्जिनिया,

बोस्टन, शिकागो, क्वाड सिटी, कोलंबस, आणि शेवटी डेट्रॉईट असे कार्यक्रम ठरले. हे कार्यक्रम ठरल्यानंतर डेट्रॉईट-मुंबई असे परतीचे ४ जूनचे तिकीट काढले.

## पहिला टप्पा - हयुस्टन

येथील मुक्काम दिनेश पटेल यांच्याकडे होता. ज्योती ठकार यांचे यजमान नारायण ठकार यांचे आणंद येथील कॉलेजमधल्या हॉस्टेलमधले ते रूम पार्टनर होते. गेली चार दशकांपेक्षा जास्त वर्षे ते अमेरिकेत आहेत. तेल व्यवसायातल्या कंपन्यामध्ये अनेक वर्षे नोकरी केल्यानंतर गुजराथी माणसाच्या स्वभावानुसार त्यांनी हयुस्टनला स्वत:चा व्यवसाय सुरू केला. आपला मुलगा आणि दोन पुतणे यांना घेऊन दिनेशभाईंनी रेडीमिक्स कोंक्रीटचे उत्पादन करणारा प्लांट सुरू केला. याबरोबरच त्यांनी अनेक पटेल कुटुंबियाना अमेरिकेत येऊन नोकरी/व्यवसाय करायला मदत केली. तेथील इसकॉन मंदिरात ते, त्यांच्या पत्नी मंजुबेन यांच्यासह सहभागी होतात. आमच्या वास्तव्यात मंजुबेन यांनी ढोकळे, रबडी या पारंपरिक पदारथांबरोबरीने मेक्सिकन आणि इटालियन पदार्थ खायला घालून आमचे छान आदरातिथ्य केले.


दिनेश पटेल, मुलगा अमित आणि पुतणे

आमचा पहिला कार्यक्रम पटेल कुटुंबिय आणि त्यांचे परिचित त्यांच्याकरता दिनेशभाईनी आपल्या घरी १३ एप्रिलला ठरवला. विशेष म्हणजे शास्त्रीय संगीताशी थोडाही परिचय नसलेल्यानी सुद्धा सतार-तबला वादनाचा आनंद घेतला. दूसरा कार्यक्रम १४ एप्रिलला संगीतप्रेमी मंडळी आणि कलाकार यांनी आयोजित केला होता. ज्योती ठकारांच्या परिचित मूळच्या नगर येथील रुपाली कोठी आणि हयुस्टन येथील संगीत क्षेत्रात कार्यरत असलेल्या ज्योती कुलकर्णी यांनी पुढाकार घेऊन "घर- बैठक" आयोजित केली. तिथे अनेक वर्षे वास्तव्य असणाऱ्या कुरहाटी यांच्या प्रशस्त आणि सुंदर बंगल्यामध्ये हा कार्यक्रम झाला. पुण्यातल्या CWPRS मध्ये काम केलेल्या मोहन केतकर यानी साऊंड सिस्टीम छान सांभाळली. दुपारची मैफिल असल्याने आम्ही राग मुलतानीने सुरवात केली. या दोन्ही मैफिलीना छान प्रतिसाद मिळाल्याने आमचा उत्साह वाढला.


मनोज आणि रंजना दंडवते

## ॲटलांटा

दोन गावांमधल्या प्रवासाला तीन तासांपेक्षा अधिक वेळाचे कार ड्राइव्हिंग जिथे लागणार होते ते प्रवास आम्ही विमान/रेल्वे/बसने केले. त्यामुळे हयुस्टन ते ॲटलांटा आणि नंतर ॲटलांटा ते राले हे प्रवास आम्ही साऊथ वेस्ट एअरलाइनने आणि बोस्टन-शिकागो अमेरिकन एअरलाइनने केले. साऊथवेस्ट एअरलाइनमध्ये दोन चेक-इन बॅगना परवानगी असल्याने ते सोयीचे झाले. त्याकरता आम्ही आमचे सर्व (दोन महिन्यांचे) सामान फक्त एका कॅरिऑन बॅग (७ कि. वजन) मध्ये बसवले होते. त्यामुळे विमानात चेक इन करायची तबल्याची फायबरग्लास केस, एक कॅरिऑन बॅग (७ कि वजन) आणि लॅपटॉपची सॅक एवढेच सामान होते. आम्हाला अकरा शहरांमधल्या सतरा घरांमध्ये रहायचे होते, बस आणि रेल्वे प्रवास होता आणि कारमध्येही दोघांचे सर्व सामान मावणे जरुरीचे असल्याने, कमीत कमी सामान ठेवले.

ॲटलांटाला पोचल्यावर तेथील विमान तळाची भव्यता आणि गर्दी जाणवली. जगातील सर्वात मोठ्या असलेल्या डेल्टा एअरलाईनचे मुख्य केंद्र असलेल्या आणि वर्षाला दहा कोटीपेक्षा अधिक प्रवासी वहातूक करणारा म्हणून हा विमानतळ जगात पहिल्या क्रमांकाचा म्हणून प्रसिद्ध आहे. एअरपोर्टवर आम्हाला न्यायला माझ्या चुलत बहिणीचा जावई मनोज दंडवते आला होता. घरांपर्यंतच्या दीड तासाच्या प्रवासात भरपूर वाचन असलेल्या मनोजबरोबर विविध विषयांवर छान गप्पा झाल्या. मुख्य शहर मागे पडल्यावर जाताना जाणवलेली बाब म्हणजे रस्त्याच्या दोन्ही बाजूला असलेली घनदाट झाडी. ॲटलांटा **तसे** जंगलातच वसले असल्याने एवढी हिरवाई आहे. परंतु जंगलाचा काही भाग तोडून तिथे पोलिस प्रशिक्षण केंद्र सुरू करण्याची योजना असल्याने पर्यावरणवाद्यांनी त्याच्या विरोधी मोहीम उघडली आहे.



रिफ्लेक्शन @ कमिन्स, हॉलमधली मैफल

ॲटलांटा महाराष्ट्र मंडळाने (एमएमए) १९ मे या दिवशी त्यांच्या गुढीपाडवा उत्सवात आमचा कार्यक्रम ठेवला होता ही आमच्यासाठी आनंदाची गोष्ट होती. २०२३ मध्ये पॅरिस मराठी मंडळानेही त्यांच्या शिवजयंती उत्सवात आमचा कार्यक्रम केला होता. मंडळाच्या सभासदांचा कल शास्त्रीय संगीताकडे नसल्याने महाराष्ट मंडळे त्यांचे कार्यक्रम सहसा आयोजित करत नाहीत. शिवाय सभासदांच्या मुलांनाही यात गोडी नसते. पण रंजना आणि मनोजच्या प्रयत्नांना मंडळाचे पदाधिकारी मिलिंद बावडेकर यांनी साथ देऊन तेथील रिफ्लेक्शन@कमिन्स या शानदार इव्हेंट


हॉलमध्ये कार्यक्रम आयोजित केला होता. मैफिलीला बैठक व्यवस्था असते तशी इथे नव्हती तर रेस्टोरंट प्रमाणे एकेका टेबलाभोवती ४ -६ जण बसलेले होते. पण अत्यंत आधुनिक सराऊंड (ऑडिओ) सिस्टीम आणि आकर्षक प्रकाश योजना यामुळे हा कार्यक्रम भव्य वाटला. येथे आम्ही राग संगीताने सुरवात करून नंतर यमन रागावर आधारित गाण्यांचाही समावेश केला. कार्यक्रमानंतर सर्वांना हापूस आंब्याच्या रसाचे जेवण होते! त्या दिवशी मंडळाची वेबसाइटही लॉच करण्यात आली.

पुढच्या दिवशी म्हणजे २० मे ला, रंजना आणि मनोज यांनी त्यांच्या कॉलनीच्या क्लबहाऊस मध्ये माझा 'तब भी बोला' आणि नंतर सतारवादन असा कार्यक्रम आयोजित केला होता. हा सुद्धा कार्यक्रम उपस्थितांच्या पसंतीस आला.

मनोज, यूपीएस या जगप्रसिद्ध कुरियर कंपनीमध्ये सॉफ्टवेअर डिव्हिजन मध्ये आहे आणि ॲक्टिव्हिटी बेस्ड कॉस्टिंग या माझ्या आवडत्या विषयामध्ये तो काम करतोय. त्यामुळे त्यांच्या सिस्टीममध्ये डेटा अनॅलिसिस कसे करतात ते त्याने सांगितले. रंजना पुण्याच्या SIBM मध्ये एमबीए करून तिकडे गेली आणि गेली २० वर्षे व्हेक्टर कन्सलटिंग या कंपनीत मॅनेजर आहे. एकाच आयटी कंपनीत एवढे वर्ष असणे हे सध्याच्या काळात आश्चर्यच आहे!

## नॉर्थ कॅरोलिना

पुढच्या कार्यक्रमाकरता राले(एनसी) जाण्यासाठी अटलांटा विमानंतळावर मनोजने आम्हाला सोडले. साऊथ ईस्टर्न एअरलाईनने दोन तास प्रवास करून आम्ही नॉर्थ करोलीना मधील राले विमानतळावर उतरलो. तेथून दीड तासांवर असलेल्या गोल्डसबोरो या गावात माझी मावसबहिण उज्ज्वला आणि यशवंत नातू हे राहतात. आधी बोटस्वानातही शिक्षकी पेशात असलेले ते दोघे गेली काही वर्षे अमेरिकेतल्या शाळेमध्ये शास्त्र आणि गणित हे विषय शिकवतात. त्यांनी आमचे तीन कार्यक्रम ठरवले होते. एअरपोर्टवरून नेण्यासाठी यशवंत आले होते. त्यांच्या घरी जाताना वाटेत अमेरिकेत भारतीय खाद्य पदार्थ आणि किराणा मालाकरता प्रसिद्ध असलेले पटेल ब्रदर्सच्या दुकानाला भेट दिली. मेकॅनिकल इंजिनियर असलेल्या मफत पटेल यांनी आपल्या भावाच्या सहायाने १९७४ मध्ये सुरू केलेल्या एका लहानशा दुकानाची संपूर्ण अमेरिकेत आता ५२ स्टोअर्स ची साखळी निर्माण झाली आहे. अशा अनेक इंडियन स्टोअर्समुळे अमेरिकेत


उज्ज्वला आणि यशवंत नातू यांच्याबरोबर

भारतीय पदार्थ मिळत असल्याने आमच्या सारख्या शाकाहारी आहार करणाऱ्यांची छान सोय झाली आहे.

२२ आणि २३ मे या दिवशी यशवंत आणि उज्ज्वला यांनी  त्यांच्या शाळांमध्ये आमची सतार-तबला वादनाची प्रात्यक्षिके आयोजित केली होती.  यशवंतच्या वेन हायस्कूल मध्ये आम्हाला घेऊन जायला पुण्याच्या ज्ञान प्रबोधिनी प्रशाळेतील माझ्या एक वर्ष पुढे असलेला शिवराम उर्फ राजा परांजपे आला होता. गंमत म्हणजे तो मला तब्बल पन्नास वर्षांनी आणि तेही अमेरिकेत भेटला! अमेरिकेत न्यूक्लिअर पॉवर प्लांट मध्ये अनेक वर्षे  काम करून तो निवृत्त झाला आहे. रोज जिम, सायकल चालवणे आणि मोजके खाणे हे कटाक्षाने तो करतो आहे. जाता-येता त्याच्याशी प्रबोधिनी, कै. अप्पा पेंडसे, इतर मित्र अशा खूप विषयांवर गप्पा झाल्या.

उज्ज्वला तेथील हौशी मधमाशी पालन क्लबची सभासद आहे. क्लबच्या प्रमुख बाईच्या बंगल्यात असलेले एक छोटेसे केंद्र बघायला आम्ही गेलो होतो. अर्थात संरक्षक जाळी असलेले पांढरे पोशाख आम्ही घातले आणि मगच जवळ गेलो! त्यानंतर २४ मे, शुक्रवारी, संध्याकाळी नातू कुटुंबाचे परिचित असलेल्या डॉ. नलिनी चेंगप्पा यांच्याकडे संध्याकाळी आमची मैफल झाली. प्रेक्षकांमध्ये बहुतांश अमराठी होते. शास्त्रीय-सुगम प्रकारांचा समावेश असलेली ही मैफल. एरवी फक्त भजने  ऐकणाऱ्या श्रोत्यांनाही पसंतीस आली. नंतर घरी करून आणलेल्या चविष्ट पदार्थांचा आस्वाद घेत भरपेट भोजन झाले.

## कॅरि गावाला प्रस्थान

नलिनी चेंगप्पांकडचा कार्यक्रम झाल्यावर तेथूनच रात्री आम्ही ज्योती ठकारांचा कॅरि गावात रहाणार पुतण्या विद्वत ठकार त्याच्या बरोबर त्याच्या घरी  गेलो. राले, डरहॅम आणि चॅपल हिल ही तीन शहरात तीन जगप्रसिद्ध विद्यापीठे असलेल्या या भागाला ‘रिसर्च ट्रॅंगल’ म्हणतात. यातील ड्यूक युनिव्हर्सिटीला आम्ही एक दिवस भेट दिली. विद्वत ठकार मायक्रोसॉफ्ट कंपनीत आहे, गाणे शिकतोय आणि नाटकातही काम करतो. प्रीती योगशिक्षिका आहे व ती ऑनलाइन आणि ऑफलाइन योगवर्गात शिकवत असते.  रोज सकाळी मी, विद्वत आणि त्यांचा (कुटुंबातील सदस्य) ‘कस्टर्ड’ नावाचा पांढऱ्या रंगाचा उमदा कुत्रा असे फिरायला जात असू. तेथून जवळच असलेल्या मॉरिसव्हील गावातील तौर्य  प्रतिष्ठानने २८ एप्रिलला सकाळी आमचा कार्यक्रम आयोजित केला होता. त्यात आम्ही वेळेनुसार आधी तोडी आणि नंतर सारंग हे राग सादर केले. या कार्यक्रमाला तेथे स्थायिक असलेले  डॉ. आनंद (श्रीराम लागू यांचे चिरंजीव) हे त्यांची पत्नी  डॉ. संध्या लागू यांच्यासह उपस्थित होते.



तौर्य प्रतिष्ठान, कॅरि

माधव आणि रमा मांजरेकर या कलाकार दांपत्याने तौर्य प्रतिष्ठान या नावाने एक सांस्कृतिक केंद्र मोरिसविल या गावात स्थापन केले आहे. तौर्य म्हणजे 'गायन, वादन आणि नृत्य यांचा समन्वय. रमा मांजरेकर कथक नृत्यांगना आहेत आणि त्यांच्या तौर्य स्टुडिओत कथक नृत्याचे शिक्षण देतात. युनिव्हर्सिटी ऑफ नॉर्थ कॅरोलिना मधली नोकरी सांभाळून माधव तिथल्या मराठी मंडळीना घेऊन नाट्यकला जोपासतो आहे. आम्ही तेथे असतानाच 'संगीत वस्त्रहरण' या नाटकाच्या तालमी चालू होत्या. जर्मनीतील बर्लिन जवळच्या ब्राऊनश्वाईक या गावातल्या तेथील आंतरराष्ट्रीय उत्सवात महाराष्ट्र मंडळातर्फे २०२३ मध्ये आमचा सतार वादनाचा कार्यक्रम झाला होता. या मंडळाचे उत्साही अध्यक्ष अमोल भागवत आणि माधव हे मित्र असल्याने इथे आमचा कार्यक्रम ठरला.

## व्हर्जिनिया



गिरीश गुप्ते, सान्वी, आकांक्षा शुक्ल, एलिन गुप्ते

विद्वत आणि प्रीती यांचा एक आठवडयाचा पाहुणचार घेऊन आम्ही व्हर्जिनियात राहणाऱ्या गिरीश गुप्ते यांच्या घरी जाण्यासाठी विद्वत बरोबर निघालो. एकूण प्रवासातील अर्धा रस्ता (अडीच तास) गेल्यानंतर मॅकडॉनल्ड मध्ये कॉफी ब्रेक घेतला. पुढचा प्रवास करण्यासाठी नित्यनाथ शुक्ल तिथे आले होते. त्यांची मुलगी सान्वी ही ज्योती ठकारांकडे सतार शिकते आहे. नित्या यांना थोरल्या बंधूसमान असलेले श्री. गिरीश गुप्ता यांनी त्यांच्या चॅंटिली (व्हर्जिनिया) मधील आपल्या आलीशान घरात आमचा कार्यक्रम ४ मे या दिवशी आयोजित केला होता. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील सल्लागार कंपनीचे मालक असलेले गिरीश हे बासरी वादकसुद्धा आहेत. त्यामुळे सतारवादनाला दिलेली त्यांची दाद आम्हाला मोलाची वाटली. गिरीश यांची पत्नी मयूरा रियल इस्टेट क्षेत्रात कार्यरत आहे. या कर्तबगार दांपत्याने आपल्या दोन्ही व्यवसायांमध्ये मोठे नाव कमावले आहे. या कार्यक्रमाला तिथे रहाणाऱ्या आमच्या परिचित पुण्याच्या नीलिमा पंचांग आणि श्रद्धा साने आवर्जून आल्या होत्या.

## मेरीलॅंड


सुंदर सजवलेल्या रंगमंचावरचे वादन

कार्यक्रम संपल्यावर लगेचच आम्ही रात्री जर्मनटाउन मध्ये रहात असलेल्या नित्यनाथ शुक्ला यांच्या घरी गेलो. ५ मे, रविवार या दिवशी दुपारी ४ वाजता मेरीलँड मध्ये त्यानी त्यांचे मित्र वेंकट यांच्या सहकार्याने तेथे राहणारे श्री. नायर यांच्या घरी आमचा कार्यक्रम ठरवला होता. नायर पतीपत्नी पूर्वी मुंबईत रहात असल्याने मराठी चांगले बोलतात. ग्रुप फोटो घेताना सर्व जण व्यवस्थितपणे फोटोमध्ये यावे, याकरता नायर पती-पत्नी चक्क खाली बसले. त्यांचा हा साधेपणा विशेष भावला. वेळेनुसार आम्ही मुलतानी रागाने सुरवात केली. नंतर राग हंसध्वनी. भजन आणि भैरवी असे वादन सादर केले. कार्यक्रमानंतर घरून करून आणलेल्या विविध पदार्थांचा समावेश असलेल्या सुग्रास भोजनाचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाला आपल्या मुलाकडे सध्या आलेला माझा शाळेतला मित्र संजय गोखले आणि तिथे जवळ राहाणारे आमचे परिचित शेखर आणि रोहिणी मोघे आले होते. कार्यक्रम झाल्यावर मला घ्यायला आलेल्या माझ्या भाचीचा नवरा यश मराठेबरोबर त्यांच्या घरी जायला निघालो. विशेष म्हणजे तो त्या दिवशीच सकाळी चीन देशाचा आठ दिवसांचा मोठा प्रवास करून आला होता. घरी थोडीशी विश्रांती घेऊन तीन तास ड्रायव्हिंग करून तो न्यायला आला आणि नंतर थोड्याच वेळात परत तीन तास ड्रायव्हिंग करून मला आपल्या घरी घेऊन गेला. ज्योतीताई मेरीलँडमध्ये शुक्ल कुटुंबात राहून नंतर न्यू जर्सी मार्गे बोस्टनच्या कार्यक्रमाकरता १७ मे ला पोचल्या.

### नाजरेथ

पुढचे आठ दिवस मी पेनसिलवानिया राज्यातील ॲलनटाउन जवळचे नाजरेथ या लहानशा गावात होतो. यश आणि मैत्रेयी मराठे, त्यांची चार वर्षांची अवखळ पण लाघवी किमया, आणि सहा महिन्याची त्यांची तुडतुडी ब्लॉसम (कुत्र्याचे पिल्लू) यांच्या सहवासात खूप मजा आली. यश आणि मैत्रेयी हे दोघेही ॲव्हरी डेनिंसन या कंपनीत आहेत. मैत्रेयी सेफ्टी ऑफिसर आहे तर यश सप्लाय चेन मॅनेजर आहे. या दोघांनी त्यांच्या मित्रमंडळींच्या मदतीने १२ मे या दिवशी माझा "तब भी बोला" हा कार्यक्रम त्यांच्या घरी आयोजित केला होता. माझे वादन झाल्यानंतर सूत्रसंचालक संदीप धारेश्वर याने माझी मुलाखत घेतली. तेथील कलाकार वर्षा फडकेने हार्मोनियमवर चांगली


'तब भी बोला' - मैत्रेयी मराठे आणि वर्षा फडके

साथ  केली. तिचा नवरा समीर फडके तिकडे आर्थिक सल्लागार (फिनान्शियल प्लॅनर) म्हणून काम करतो आहे. त्याच्याकडून मी अमेरिकेतील गुंतवणूक आणि विमा या विषयी चर्चा केली. त्याच्या मते अमेरिकेत इन्कम टॅक्सचा बोजा खूप असल्याने कर वाचवणाऱ्या गुंतवणुकीला प्राधान्य असते. तरुण/माध्यम वयाचे बहुतेक सर्वजण घरासाठी कर्ज घेत असल्याने त्यांच्या पगारातून फक्त पेन्शन प्लॅन (401K) मध्ये दर महिना पैसे भरू शकतात. अमेरिकेत ५०% पेक्षा जास्त लोक म्युच्युअल फंडात गुंतवणूक करत असले तरी मी अमेरिकेत ज्यांना भेटलो त्यांच्यापैकी फारसे कोणी तेथील म्युच्युअल फंडात गुंतवणूक करत नव्हते.

## बोस्टन

आमचा पुढचा कार्यक्रम १८ मे  ला बोस्टनला होता. तेथे रेल्वेने जाणे सोयीचे असल्याने यशने नाजरेथपासून दीड तास असलेल्या नेवर्क (न्यू जर्सी)  रेल्वे स्टेशनवर मला पोचवले. तेथून दुपारी २ वाजता निघणाऱ्या ॲमट्रॅक कंपनीच्या ट्रेनने मी निघालो.  ट्रेन एक तास उशीरा होती. त्याबद्दल  स्टेशन वर काहीच सूचना मिळत नव्हती तर ॲमट्रॅक कंपनीच्या ॲप वर बघून वेळ कळत होती. जेंव्हा रात्री ८ वाजता बोस्टन स्टेशनवर मी पोचलो, तेंव्हा मला आपल्या घरी घेऊन जायला (प्रा. डॉ.) दीपक जोगळेकर आला होता. मी पुणे विद्यापीठात (पुंबा) एमबीए च्या वर्गाला शिकवत होतो तेव्हाचा तो विद्यार्थी. कनेक्टिकट विद्यापीठातून एमएस आणि त्यानंतर ‘पर्यावरणीय अर्थशास्त्र’ (Enviro. Economics) या विषयात पीएचडी  केल्यानंतर तो तेथील एका कॉलेजमध्ये अर्थशास्त्राचा प्राध्यापक आहे. गाणे आणि पर्यावरण हे आमच्यातले कॉमन विषय. त्याच्याबरोबार गाडीतून जाताना मल्लिकार्जुन मनसुर, भीमसेन अशा गवयांची गाणी ऐकून चांगल्या गवयांची लक्षणे कोणती, आणि ती समजल्यावर आपले श्रवण कसे समृद्ध होत जाते यावर आमच्यात चर्चा होत होती. दीपकच्या घरी मी तीन दिवस होतो आणि त्याच्याबरोबर जवळच्या पार्क मध्ये फिरायला जात होतो. त्याच्या जुळया मुली इशानी आणि मेघना व्हायोलीन वाजवतात. त्यांच्या शाळेतल्या ऑर्केस्ट्राचा शो बघण्याची संधी मिळाली. एक हजार प्रेक्षकांच्या भव्य ऑडिटोरियममध्ये प्रशस्त रंगमंचावर ३० पेक्षा जास्त कलाकारांनी केलेले शिस्तबद्ध  गायन, वादन ऐकायला मिळाले. व्हायोलिन्स, क्लारीनेट (विविध प्रकारचे), ब्रास, सेलो, हार्प, फ्लूट, ट्रंपेट, ड्रम्सचे प्रकार, आणि



इशानी, दीपक व मेघना जोगळेकर

इतर पर्कशन वाद्यांचे एकत्रित सुरेल वादन लक्षात राहाण्याजोगे होते. बाजूला लावलेल्या स्क्रीनवर कलाकारांची माहिती दिसत होती.

दीपककडे तीन दिवस राहिल्यानंतर मी माझ्या चुलतभावाचे, उदयचे मामा आनंद (अरुण) लेले त्यांच्या घरी राहायला गेलो. ५० वर्षांपेक्षा अधिक काळ अमेरिकेत असलेल्या या दोघांनी माझे उत्साहाने स्वागत केले. अरुणमामा (वय ८८ वर्षे) आणि पुष्पामामी (वय ८५वर्षे) हे दोघे पाच वर्षांपूर्वी सीनियर कम्युनिटी लिविंग मध्ये राहायला आले आहेत. अरूणमामाना त्यांचा जुना मित्र मधुमेह सध्या त्रास देत असला तरी त्यांच्या 'आनंद' या नावाला साजेसा त्यांचा आनंदी स्वभाव आपल्यालाही प्रफुल्लित करतो. ब्रेकफास्टसाठी ते मला इंग्लिश माफिन गरम करून आणि बटर लावून देत. वरती फिल्टर कॉफीसुद्धा! त्यांच्या बीएमडब्ल्यूने मला ते सगळीकडे घेऊन गेले. त्यामुळे जवळची निसर्गरम्य ठिकाणे बघता आली आणि पक्षी छायाचित्रणही करता आले. त्यांची जुनी घरे त्यांनी दाखवली आणि तेथील घरांची रचना सिविल इंजिनियर असलेल्या अरुणमामानी बारकाईने समजावली. निवृत्त झाल्यानंतर अनेक वर्षे अरुणमामा दोन-चार आठवडे क्रूझवर जाऊन ब्रिज शिकवत असत. शाळेतून निवृत्त झालेल्या पुष्पामामी लेखिकाही आहेत. त्यांनी लिहिलेली एक गोष्ट त्या रोज रात्री वाचून दाखवायच्या. त्यांच्या हातचे रुचकर खाणे आणि भरपूर गप्पा यामुळे खूप मजा आली.


सानिका साने, निवेदिता जोशी आणि श्रीनिवास साने

बोस्टनमधला कार्यक्रम ज्योती ठकार यांची कन्या प्राचीची मैत्रीण निवेदिता जोशी हिने ठरवला होता. नू. म.वि., पुणे या शाळेचे विद्यार्थी प्रिय शिक्षक रमेश परचुरे यांची ती कन्या. "आपल्या मैत्रिणीची आई एवढे वर्षे सातत्याने सतारवादन करते आहे, ते आपल्या मित्रमंडळीना ऐकवले पाहिजे" या उद्देशाने तिने उत्तम नियोजन करून हा कार्यक्रम घडवून आणला. संगीतप्रेमी आणि बासरी वादक असलेल्या श्रीनिवास आणि सानिका साने यांच्या घरी तिने तो आयोजित केला होता. चांगले माईक आणि साऊंड सिस्टिम असल्याने कार्यक्रमाची रंगत वाढली. जाणकार श्रोत्यांचा प्रतिसाद चांगला मिळाला. विशेष म्हणजे कार्यक्रमानंतर निवेदिताने स्वतः बनवलेले छोले, पोळया, पुलाव, कोशिंबीर, पनीर रस्सा, गुलाबजाम असे साग्रसंगीत जेवण सर्व प्रेक्षकांसाठी होते. मैत्रीचं खेळकर वातावरण होतं. कार्यक्रमाला तेथे शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम आयोजित करणाऱ्या षडज संस्थेचे राजेश गोडबोले, भावना व अजय गल्लेवाले, दीपक जोगळेकर, महेश कुलकर्णी अशी मंडळी उपस्थित होती. याच

दिवशी आनंद आणि पुष्पा लेले यांच्या लग्नाचा ६२ व्या वाढदिवस असल्याने सर्वांनी त्यांना शुभेच्छा दिल्या.

**शिकागो**

बोस्टनचा कार्यक्रम झाल्यावर तेथून दुसऱ्या दिवशी (१९ मे) पहाटेच निवेदिताने ६० किमी पेक्षा जास्त अंतरावर असलेल्या बोस्टन विमानतळावर सोडले. सकाळच्या फ्लाइटने आम्ही त्याच



सुलक्षणा, तेजस्विनी, समीर बोंगाळे, सदानंद जोशी, संजीव कुलकर्णी

दिवशी असलेल्या कार्यक्रमाकरता शिकागोला आलो. एअरपोर्टवर सदानंद जोशी न्यायला आला होता. सदानंद आणि तेजस्विनी महाराष्ट्र मंडळाचे काम करतात. तेजस्विनीची बहीण सुलक्षणा कुलकर्णी ही मंडळातर्फे चालवल्या जाणाऱ्या मराठी शाळेचे काम करते. शिकागो महाराष्ट्र मंडळाच्या आणि अमेरिकेतील बृहन महाराष्ट्र मंडळाच्या (बी.एम.एम) मधील पदाधिकारी डॉ. विद्या जोशी यांच्या बरोबर कार्यक्रम ठरवण्याकरता बरेच दिवस चर्चा चालू होती. पण त्या कॅनडात राहायला गेल्याने त्यांनी सदानंद आणि तेजस्विनी जोशी यांच्या पुढाकाराने आमचा कार्यक्रम निश्चित केला. विद्याताईनी हॉलमध्ये लागणारे स्टेज आणि ध्वनी व्यवस्था याची सोय केली. सदानंद आणि तेजस्विनी यांनी त्यांच्या मित्रमंडळीच्या सहकार्याने शॉमबर्ग येथील इंडिया हॅबिटाट च्या सुंदर हॉल मध्ये हा कार्यक्रम चांगल्या प्रकारे केला. या कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष समीर बोंगाळे आणि अमेरिकेत पन्नासपेक्षा अधिक वर्ष रहात असलेले डॉ. प्रकाश आणि डॉ. अंजली साने, हे दोघे डॉ. उदय तळवलकर आणि डॉ. गिंडे या मित्रांसह आवर्जून आले होते. माझी भाची सिद्धी कुलकर्णी आणि फिलिप्समधले मित्र श्याम भंडीवाड यांचे भाऊ मोहन यांनी त्यांच्या मित्रमंडळीसह येऊन आम्हाला दाद दिली.

हा कार्यक्रम झाल्यानंतर पुढच्या मुक्कामाकरता शिकागोमध्येच रहाणाऱ्या गीता आणि अभिजीत नाईक यांच्या बरोबर त्यांच्या घरी गेलो. घरात गेल्यावर लगेचच जाणवलेली बाब म्हणजे खूप ऊंची असलेला भव्य हॉल आणि लिव्हिंग रूम आणि स्वागताला त्यांची लाडके श्वान तारा. एका रियल इस्टेट कंपनीत गीता मॅनेजर आहे आणि अभिजीत SAP या ईआरपी सॉफ्टवेअर बनवणाऱ्या कंपनीत आहे. अभिजित आम्हाला शिकागोच्या डाउनटाउन मध्ये फिरायला घेऊन गेला होता. स्वामी विवेकानंद यांनी गाजवलेली धर्मपरिषद ज्या जागी भरली होती ती वास्तु आणि जगप्रसिद्ध

सिअर्स टॉवर्स असे आम्ही बघितले. आमचा पुढचा कार्यक्रम शिकागोपासून अडीच तास अंतरावर असलेल्या क्वाड सिटी मध्ये २५ मे या दिवशी होता. त्याकरता २२ मे ला आम्ही क्वाड सिटीमधील बेडेनडॉर्फ मध्ये राहणाऱ्या नील बेहेरे त्याच्या बहुचर्चित टेसला कारने निघालो. फिलिप्समध्ये असताना मीसुद्धा ईआरपी मध्ये काम केले होते. नील बेहेरे सुद्धा SAP मध्येच काम करत असल्याने आमच्या तिघांच्या छान गप्पा झाल्या.

## क्वाड सिटी

आयोवा राज्यातील बेडनडॉर्फ, डेव्हेनपोर्ट आणि इलीनॉय राज्यातील मूलीन, रॉक आयलंड, अशा दोन राज्यातील छोट्या आकाराच्या चार शहराना क्वाड सिटी म्हणतात. जगातील सर्वात लांब नद्यांमध्ये दुसऱ्या क्रमांकाच्या मिसीसिपी नदीच्या दोन्ही बाजूला इलीनोंय आणि आयोवा ही दोन राज्ये आहेत. शिकागोहून मूलीनला जाताना रस्त्याच्या दोन्ही बाजूला मका, सोयाबीन यांची भली मोठी शेते दिसत होती. युरोप-अमेरिकेतील प्रचंड आकाराच्या शेतांची आपल्या इथल्या शेतांशी तुलना होऊ शकत नाही. भारतीय शेतकऱ्याकडे सरासरी फक्त अडीच एकर शेतजमीन आहे तर अमेरिकेतल्या शेतकऱ्याकडे त्याच्या कितीतरी पट, म्हणजे सरासरी ४५० एकर जमीन आहे. त्यामुळे मनुष्यबळाच्या अभावी ट्रॅक्टर, हार्वेस्टर अशी यंत्रेच शेतीची सर्व कामे करू शकतात. यांचे उत्पादन करणाऱ्या जगप्रसिद्ध जॉन डिअर या कंपनीचे कारखाने आणि मुख्य केंद्र क्वाड सिटी मध्ये आहे. आमचा कार्यक्रम ठरवणारे नील व निशा बेहेरे, प्रिया कुलकर्णी आणि त्यांची मित्रमंडळी जॉन डिअर मध्ये नोकरी करतात. निशा आणि प्रिया या दोघी माझी मामेबहिण शुभदा आठवले हिच्याकडे गाणे शिकतात. हे तिघे आणि नंदिनी व योगेश जोशी या सर्व उत्साही हसतमुख मंडळीनी आमचा कार्यक्रम रॉक आयलंड येथील हिंदू मंदिरात ठरवला होता. एक महिना आधी त्यांनी भरपूर प्रचार करून हा कार्यक्रम यशस्वी केला. उपस्थित असलेल्या शंभरपेक्षा अधिक रसिकामध्ये अमराठी आणि अमेरिकनही होते.


मंदिरातील कार्यक्रम

क्वाड सिटी मधे बेहेरे कुटुंबामध्ये आम्ही सहा दिवस राहिलो होतो. निशा आणि नील या दोघांच्या मातोश्री पण तिथे असल्याने अधिक जिव्हाळ्याने आमचे स्वागत झाले. येथील मुक्कामात रोजच सांगीतिक कार्यक्रम चालू होते. मंदिरातील कार्यक्रम झाल्यावर डेबरा स्टोरी या ज्येष्ठ पियानो वादक आणि यांच्या बरोबर आम्ही भारतीय आणि पाश्चात्य संगीत याविषयी चर्चा केली. त्या वेळी त्यांनी "तुमचे संगीत अतिशय प्रगल्भ आहे" असे मत व्यक्त केले. दुसऱ्या दिवशी शहारातले एक ज्येष्ठ

डॉक्टर माझ्याकडून तबला शिकायला आले होते. पुण्यातील एक गायिका शुभदा देशपांडे तिच्या भावाकडे त्या वेळी आली होती. तिने उपशास्त्रीय संगीताचे शिक्षणही घेतले आहे. २७ मे या दिवशी तिथे मेमोरियल डे ची सुट्टी होती. त्याचा फायदा घेऊन या संगीतप्रेमी मंडळींनी सकाळची मैफल ठरवली. गायन व सतारवादनातून तोडी, भैरव, असे सकाळचे राग आणि रागमाला या बरोबरीने ठुमरी, दादरा यांचाही आनंद रसिकांना घेता आला. या अनौपचारिक कार्यक्रमांनाही चांगला प्रतिसाद मिळत होता.

लहानपणी ठाण्यात तबला शिकलेला नील बेहेरे नंतर काही दिवस माझ्याकडे (ऑनलाइन) तबला शिकत होता. तो तिथल्या मुलांना हसत- खेळत तबला शिकवतो. त्याच्या विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाचा एक छोटेखानी कार्यक्रम त्याने केला. त्यात मी माझा 'तब भी बोला' हा विशेष कार्यक्रम सादर केला. मुलांनी वाजवलेले बोल घेऊन त्याचा विस्तार कसा करता येईल हे त्यांना दाखवले. त्यांना माझ्या वादनाबरोबर अतिद्रुत लयीत ठेका म्हणायला सांगून सामील करून घेतल्याने सगळ्यांनाच मजा वाटली.

प्रिया कुलकर्णीने तेथील एक माध्यमिक आणि प्राथमिक शाळेत आमची संगीत प्रात्यक्षिके ठरवली होती. आमचे दुसरे प्रात्यक्षिक चालू असताना अर्ध्या तासानी "एक थंडर स्टॉर्म/टोरनाडो येते आहे, सर्वांनी शेल्टरमध्ये जमावे" अशी सूचना आली. आम्हाला आमचे प्रात्यक्षिक थांबवावे लागले आणि आम्ही पण शेल्टरमध्ये गेलो. तिथे आम्ही जवळपास अर्धा तास होतो आणि वादळाचा जोर कमी झाल्यावर निघालो. वादळाचा वेग फार नसल्याने फारशी हानी झाली नाही, पण पाऊस मात्र खूप पडला. अमेरिकेत मिळालेला हा वादळाचा अनुभव लक्षात राहाण्यासारखा होता.


नील बेहेरे – (मागे पायपर आर्चर विमान)

नील बेहेरे एक हौशी पायलटही आहे आणि तिथल्या फ्लाईंग कंट्रीक्लबचा सदस्य आहे. क्लबच्या एका (चार सिटर) पायपर आर्चर या छोट्या विमानातून त्याने मला चाळीस मिनिटे फिरवून आणले. संपूर्ण क्वाड सिटीचा परिसर नद्या, तलाव, रस्ते, पूल, हिरवाई, घरे,डोंगर यांचे विहंगम दृश्य बघायला मिळाले, जे कायम लक्षात राहील. क्वाड सिटीमधली आणखी लक्षात राहाण्यासारखी गोष्ट म्हणजे नील आणि सुबोध कुलकर्णी बरोबर तेथील क्रेडिट आयलंड वर जाऊन अमेरिकेचा राष्ट्रीय पक्षी असलेल्या बॅल्ड ईगलचे आणि घरट्यात असलेली पिल्लं यांचे फोटो काढता आले.

## कोलंबस (ओहायो)

आपल्याकडे जशी वडगाव नावाची अनेक गावे आहेत तशी एकाच नावाची अनेक शहरे अमेरिकेत आहेत. गंमत म्हणजे तेथील ५० राज्यांमधल्या २३ राज्यात (सुप्रसिद्ध कोलंबसवरून) कोलंबस नावाचे शहर आहे. तर कोलंबस आणि कोलंबिया मिळून एकूण ६० आहेत! कुठल्या कोलंबसविषयी बोलतोय हे माहीत नसल्याने काही वेळा गोंधळ होत असे. आमचा पुढचा कार्यक्रम कोलंबस (ओहायो) ला १ जूनला होता. तेथे जायला क्वाड सिटी पासून सोयीच्या फ्लाइट नसल्याने आम्ही अमेरिकेतील प्रसिद्ध ग्रेहॉऊंड बसने जायचे ठरवले. मूलीन ते शिकागो आणि तिथे अडीच तास थांबून पुढे कोलंबस असा प्रवास केला. पहिल्या बसमध्ये आम्ही फक्त पाच प्रवासी होतो. पुन्हा एकदा शिकागोच्या रस्त्यावर मका आणि सोयाबीन यांची शेकडो एकर पसरलेली शेतं आणि मधेमधे धान्य साठवण्यासाठी मोठाले सायलोज म्हणजे टाक्या, असं दृश्य होते. नंतर शिकागो ते इंडियनापोलिस या रस्त्यावर संख्येने आणि आकारानेही मोठ्या प्रमाणात पवनचक्क्या (windmill) दिसल्या.

परडयूच्या (इंडियाना पोलीसच्या आधी) स्टॉपवर बस थांबली आणि मराठी बोलणारे एक दांपत्य बसमध्ये चढून माझ्या मागच्या सीटवर बसले. माझे फोनवरचे मराठीमधले संभाषण ऐकून ते बोलायला लागले. एकमेकांची ओळख करून घेतली. ते होते डॉ. सतीश आणि दीपाली देवधर. अहमदाबाद येथील जगप्रसिद्ध इंडियन इंस्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटमध्ये (IIM) फॅकल्टी-डीन म्हणून सतीश कार्यरत आहेत. आपल्या मुलाच्या पदवीदान समारंभासाठी हे दोघेही अमेरिकेत आले होते. ओहायो विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात पीएचडी करून ते पंधरा वर्षांपूर्वी भारतात आयआयएम मध्ये प्राध्यापक म्हणून आले. त्यांच्या पुढाकाराने कॅट (CAT) या IIM च्या प्रवेश परीक्षेचे संगणकीकरण दोन वर्षात झालं. "शेतीचे अर्थशास्त्र (अग्रिकल्चरल इकॉनॉमिक्स)" हा त्यांच्या संशोधनाचा विषय आहे. वादग्रस्त ठरल्यामुळे मागे घेतलेले शेतकरी कायदे देशाच्या हिताचे असल्याने ते कसे अमलात आणण्याची उपाययोजना सुचवणारा एक अहवाल त्यांनी सरकारला सादर केला आहे. तसेच पुरातन भारतीय अर्थशास्त्र याविषयी त्यांचा अभ्यास आहे आणि त्याविषयी ते लिखाण केले आहे. "प्राचीन अर्थशास्त्र प्रगत होते आणि ते आधुनिक अर्थशास्त्रातील तत्वांवरच आधारित आहे. ॲरीस्टॉटलपेक्षा चाणक्य जास्त प्रगत विचारांचा होता" असं त्यांनी मला सांगितलं.



डॉ. सतीश आणि दीपाली देवधर- (बसप्रवासात)

दीपाली, या डॉ.  विकास कशाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली त्या संगीताचार्य पदवीचा अभ्यास करतायेत आणि लक्षण गीतांचं महत्त्व या विषयावर त्या आपल्या प्रबंध सादर करणार आहेत.



डॉ.शिव आणि लीना हिरेमठ यांच्याबरोबर

आनंदाची गोष्ट म्हणजे मी  लिहिलेलं "गुण घेईन आवडी- संवाद गान गुरूशी" हे पुस्तक आपण खरेदी केल्याचं मला दीपाली यांनी सांगितलं आणि या पुस्तकाच्या लेखकाशी भेट झाली म्हणून त्यांनी आनंद व्यक्त केला. देवधर कुटुंबाशी बोलताना आमच्या अनेक ओळखी निघाल्या आणि संगीत आणि अर्थशास्त्र यावर आमच्या गप्पा रंगल्या असतानाच कोलंबस आले.  उत्तम रस्ते, आणि आरामदायी बस यामुळे आमचा १२ तासांचा, सुमारे ८०० किमी बसप्रवास छान झाला. बसस्टॉपवर माझा मुलगा पुष्कर याचा वर्गमित्र अमेय जुंदरे आला होता. त्याच्याबरोबर आम्ही डॉ. शिव हिरेमठ यांच्याकडे गेलो. कोलंबस (ओहायो) मधल्या डॉ. शिव हिरेमठ  यांचे नाव मला पुण्यातला हार्मोनियम वादक अमेय बिचु याच्याकडून कळले होते. अनेक वर्षे ते त्यांच्या स्वरांजली या संस्थेतर्फे भारतीय कलाकारांचे कार्यक्रम अमेरिकेत आयोजित करतात हे माहीत असल्याने त्यांच्याकडे कार्यक्रम करण्याची संधी मिळावी म्हणून मी उत्सुक होतो. मी त्यांना पहिल्यांदा मार्च महिन्यात फोन केला होता, तेंव्हा "मी भारतात जाऊन परत आलो की आपण बोलू" असं त्यांनी सांगितलं. त्यानंतर आमचा  अमेरिका दौरा सुरू झाल्यानंतर मी त्यांच्या संपर्कात होतो. अखेर आमचा कार्यक्रम त्यांनी  पक्का केला. जेंव्हा आम्ही त्यांच्या घरी पोचलो तेंव्हा त्यांच्या मोठ्या घराने आणि त्यांचे अगत्य बघून भारावलो. ते विजापूरचे आहेत, आणि कानडी मातृभाषा. पण अमेरिकेत येण्यापूर्वी ते पुण्याच्या एन.सी.एल. मध्ये  पीएचडी करत होते त्यामुळे ते मराठी बोलू शकतात. पुण्याविषयी आणि पुण्यातील कलाकारांविषयी त्यांना प्रेम आहे. त्यांच्या पत्नी डॉ. लीना या जमखंडीच्या आणि छान मराठी बोलणाऱ्या. त्यांच्याबरोबरच एनसीएल मध्ये पीचडी केले. दोघांचे संगीतप्रेम आणि मराठी संवाद यामुळे आमची त्यांची वेव्हलेन्थ लगेचच जुळली. तब्बल दीड एकर प्लॉटवर त्यांचा प्रासादासारखा बंगला आहे. घरात अनेक वाद्ये आणि प्रोजेक्टरसह अत्याधुनिक ध्वनी यंत्रणा असलेले शिवजी हार्मोनियम आणि पियानो छान वाजवतात. ते स्वतः संगीतानंद घेऊन स्थानिक कलाकारांनाही उत्तेजन देतात. त्यांच्या घरी तेथील कलाकार एकत्र येऊन आपापली कला सादर करतात. विशेष हे की एवढे मोठे घर आणि त्यातील सर्व यंत्रणा याचा सांभाळ फक्त ते दोघे मिळून करतात.

या बंगल्यातील प्रशस्त तळघरात त्यांच्या स्वरांजली या संस्थेतर्फे त्यांनी आमच्या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. स्वरांजलीच्या या व्यासपीठावर अनेक दिग्गज कलाकारानी कला सादर केली आहे त्यामुळे त्या मंचावर वादन करणं हा आमचा बहुमान होता. शिवजींचे  संगीत प्रेमामुळे दर वर्षी ते भारतात घेऊन जातात. धारवाड येथे एक फार्महाऊस  घेतले आहे आणि तेथे संगीत कार्यक्रम आयोजित करतात.



अमेय जुंदरे, शिबी लिखिते

कोलंबस मधला कार्यक्रम ठरवण्यासाठी मी तेथील तबलावादक देवदत्त चितळे, याच्या संपर्कात होतो. तो आणि त्याची  उत्साही पत्नी मुग्धा यांच्या घरी आम्ही जेवायलाही गेलो होतो. हे दोघेही संगीत ययाती देवयानी नाटकात बॅकस्टेजचे कार्यकर्ते आहेत. फुटबॉलची आवड असणारा अमेय जुंदरे कोलंबसमध्ये जेपी मॉर्गन चेस या बँकेत सॉफ्टवेअर इंजिनियर म्हणून काम करतो. सकाळी त्याच्या कारमधून जवळच्या टेकडीवर तर दुसऱ्या दिवशी ग्रीक पार्क आणि डबलिन नावाच्या उपनगरात फिरून आलो. हवा छान असल्याने फिरणे आणि पक्ष्यांचे फोटो, हे दोन्ही जमले.

## डेट्रॉईट

अमेरिकेतीलच नव्हे तर जागतिक वाहन उद्योगाचे उगमस्थान असलेला डेट्रॉईट (२ जून) हा आमच्या दौऱ्यातला शेवटचा टप्पा होता.  फोर्ड, जनरल मोटर्स या सारख्या मोठ्या वाहन कंपन्या तिथे सुरू झाल्या. माझा मित्र शिरीष जोशी यांची मोठी बहीण शैला फाटक यांनी पुढाकार घेऊन इथला कार्यक्रम आयोजित केला होता. पुण्याच्या सुप्रसिध्द कॉलेज ऑफ इंजनिअरिंग (सिओईपी) मधील मेकॅनिकल इंजीनियरिंगच्या तुकडीत  एकमेव मुलगी असलेल्या शैलाताई १९९४ मध्ये आधी जर्मनीत आणि मग अमेरिकेत गेल्या. विशेष म्हणजे त्यांनी तीन मुलांचा संसार आणि पूर्ण वेळ नोकरी संभाळून एमबीए केले.  त्यानंतर फोर्ड मोटर्स आणि ह्युलेट पॅकार्ड या कंपन्यात नोकरी करून २०२० मध्ये वयाच्या ७१ व्या वर्षी निवृत्ती घेतली. शैलाताईबरोबर डेट्रॉईट येथील कोमल रिषभ या संगीत कार्यक्रम आयोजित करणाऱ्या संस्थेचे हेमंत बाप्तीवाले, सुनील निकम आणि आनंद शारंगपाणी  हे सहआयोजक  होते. त्यांनी तेथील उद्योजिका आणि  सामाजिक कार्य करणाऱ्या हेमा राचमाले यांच्या घरातील प्रशस्त तळघरात आयोजित केला. कार्यक्रमाला उपस्थित असलेले जाणकार रसिक अनिरुद्ध फाटक यांच्या इच्छेनुसार राग मुलतानी मध्ये आलाप-


बाप्तिवाले, भिडे परिवार, श्री व सौ. सुनील निकम

जोड झाला, विलंबित, द्रुत आणि अतिद्रुत अशा तीन गती असे वादन केले. "आपली इच्छा पूर्ण झाली" असे सांगून त्यांनी नंतर समरसून दादही दिली. विशेष आनंदाची बाब म्हणजे माझा पुण्यातील मित्र सीए सुनील भिडे त्याच वेळी डेट्रॉईटमध्ये आपल्या मुलीकडे होता. लेक, जावई, व्याही यांच्यासह तो आवर्जून आला होता. साऊंड सिस्टीम संभाळणारे हेमंत बाप्तीवाले आयटी कंपनीतील नोकरी सांभाळून तेथे तबला शिकवतात. त्यांनी त्यांच्या दोन विद्यार्थ्यांना सतारीची साथ करण्याचं मार्गदर्शन घेण्याकरता दुसऱ्या दिवशी आमच्याकडे पाठवले. आपल्या विद्यार्थ्यांना साथ संगत करण्याचा अनुभव मिळावा आणि त्यांची नजर तयार व्हावी हा त्यांचा विचार वाखाणण्याजोगा आहे. मी सुद्धा शिकागो आणि कॅरिला असताना शौनक ठकार आणि अथर्व जोशी यांच्याकडून ड्रम्स कसे वाजवतात यांची माहिती घेतली होती. ऑर्केस्ट्रातील इतर वाद्यांप्रमाणे त्यांचे वादनही ते समोर ठेवलेली स्क्रिप्ट बघूनच करतात.

## शाळांमधील संगीत प्रात्यक्षिके (लेक-डेम)


आमच्या दौऱ्याचा एक विशेष म्हणजे अमेरिकेतील शाळांमध्ये केलेले सतार-तबला वादनाचे प्रत्यक्षिक (लेक्चर डेमनस्ट्रेशन). तेथील प्राथमिक, माध्यमिक आणि हायस्कूलमधील संगीत विषय घेतलेल्या विद्यार्थी आणि त्यांच्या शिक्षकांसमोर एक तासाची ही प्रात्यक्षिके होती. नॉर्थ कॅरोलीनामधील गोल्डसबोरो येथील स्प्रिंग क्रीक मिडल स्कूल आणि सदर्न वेन हायस्कूल आणि प्रिया कुलकर्णीने आयोजित केलेल्या क्वाड सिटीमधील प्लेझन्ट व्हॅली हायस्कूल आणि प्लेझन्ट व्ह्यू एलीमेंटरी स्कूल, या शाळांमध्ये ही प्रात्यक्षिके झाली. अमेरिकन शाळांचे आम्हाला जाणवलेले वैशिष्ट्य म्हणजे सुसज्ज आणि भव्य ऑडिटोरियम, अनेक प्रकारची वाद्ये असलेल्या म्युझिक रूम्स आणि उत्साही संगीत शिक्षक. त्यातही पियानो, ड्रम्स, आणि व्हायोलीन शिकणाऱ्यांचे प्रमाण जास्त आहे. आपल्याकडे एकल (सोलो) वाद्ये वाजवायची परंपरा आहे (मेलडी म्हणजे एकानंतर दुसरा असे स्वर वाजवण्याला प्राधान्य) तर त्यांची वाद्ये मुख्यत: एकत्रितरित्या वाद्यमेळात (ऑर्केस्ट्रामध्ये) वाजवली जातात. (हार्मनी म्हणजे एकत्रित गायन,वादन, कॉर्डस वाजवण्यावर भर). सुरवातीला आम्ही भारतीय संगीतातल्या स्वर, राग, लय आणि ताल या संकल्पनांची ओळख करून देत असू. त्यानंतर सतारीची माहिती सांगून त्यावर सप्तक कसे वाजते


वेन सिटी(एनसी) हायस्कूलमधले प्रात्यक्षिक

ते दाखवून नंतर राग संकल्पनेचे स्पष्टीकरण, 'दा', 'रा' असे आघात करून स्वर कसे वाजवले जातात, मंद्र, मध्य आणि तार सप्तके, रागाचे आरोह-अवरोह  हे सतारीवर वाजवून आणि स्वर गाऊन दाखवणे असा क्रम होता. नंतर दादरा/ त्रिताल यातील मध्य आणि द्रुत लयीत वादनातून राग विस्तार. तबल्या विषयी मुलांमध्ये आकर्षण असायचे. तबल्याची माहिती, तबल्याचे महत्त्व आणि योगदान सांगून तबला वादनातली 'ना, तिट' अशी अमूर्त अक्षरे वाजवून दाखवल्यानंतर थोडे स्वतंत्र वादन करत असे. या दोन्ही वाद्यांची अशी ओळख करून दिल्यानंतर द्रुत लयीत गत वाजवून एकत्र वादन केले की नंतरचा वेळ  प्रश्नोत्तरांसाठी असे. २३  मे या दिवशी प्लेझंट व्हॅली प्राइमरी स्कूल येथे आमचे डेमो सेशन झालं आणि तिथे फक्त चौथीची मुलं होती. मुले आमच्या समोरच खाली बसली होती. या छोट्या मुलांना माहिती सांगण्यापेक्षा त्यांच्याकडून ॲक्टिव्हिटी करून घेतली. त्यांना वेगवेगळ्या स्वरामध्ये गायला सांगितलं आणि ठेक्याची 'दुप्पट- चौपट-आठपट-सोळा पट' करायला सांगितली. सर्व ठिकाणी विद्यार्थी कार्यक्रमात रंगून जात आणि प्रश्नही चांगले विचारत. त्यांना असलेले कुतूहल आम्हाला जाणवलं. ही वाद्ये त्यांनी प्रथमच बघितली होती. 'तुम्ही इतर कोणती वाद्य वाजवता' हा प्रश्न सगळीकडे विचारला. याचे नेमके कारण कळले  नाही. कदाचित तिकडे जास्त वाद्ये वाजवायची पद्धत असेल!  त्यांच्या संगीत शिक्षकांनी सुद्धा यामध्ये खूप स्वारस्य दाखवलं. ईमेल पाठवून आमच्या कार्यक्रमाचे रसग्रहण केले.

## आमच्या मैफिलींचे स्वरूप

या संपूर्ण दौऱ्यात  पंधरापेक्षा अधिक कार्यक्रम आम्ही सादर केले. ॲटलांटा, कॅरी,  शिकागो आणि क्वाड सिटी मधले कार्यक्रम ऑडिटोरियम मध्ये झाले आणि अन्य ठिकाणी बैठक या स्वरूपात झाले. श्रोत्यांशी थोडा संवाद साधला तर त्यांना आमच्या वादनात चांगल्या रीतीने सामावून घेता येते, हा माझा अनुभव इथेही कामी आला. 'सतार या वाद्यावर मुख्यत: शास्त्रीय संगीत आम्ही वाजवणार आहोत आणि गाणी वाजवण्याकरता हे वाद्य अनुकूल नाही' याची कल्पना मी देत असे. आमचे शिक्षण आणि आवडही शास्त्रीय संगीत मांडण्याकडेच आहे. तरीही मैफिलीला आलेल्या बहुसंख्य  रसिकाना आपले वादन आवडावे याकरता 'रागनिवड, आलापीचा कालावधी व सुगम संगीत भाग किती असावा' याचे धोरण ठरवत असू. शास्त्रीय



रसिकांना सामील करून घेणारे निवेदन

संगीतातले जाणकार श्रोते किती असतील याचा अंदाज घेऊन शास्त्रीय आणि सुगम प्रकारांचा समावेश आम्ही केला. काही मैफिलींच्या सुरुवातीला  राग मांडण्यापूर्वी विषय प्रवेश म्हणून ‘जिवलगा राहिले दूर घर माझे’ या पुरिया धनाश्री रागातल्या गाण्याची सुरावट वाजवून त्यानंतर तो राग आम्ही सादर करत असू. अशाच पद्धतीने “हमको मन की शक्ती देना” हे  राग केदारवर आधारित असलेले  किंवा ‘कानडा राजा पंढरीचा’ (राग मालकंस) अशा गाण्यांची सुरावट (आउटलाईन) सुरवातीला वाजवून रागायची ओळख करून देलयानंतर त्यातील विलंबित, द्रुत बंदिशी सादर केल्या. परंपरेनुसार पूर्ण वादन करताना सुरवातीला आलाप, जोड आणि झाला वाजवल्यानंतर विलंबित, द्रुत आणि अति द्रुत लयीतल्या गती सादर केल्या. रुपक, झपताल, दादरा, एकताल अशा विविध तालांममधल्या गती आम्ही सादर केल्या. द्रुतगतीमधल्या वादनात सवाल-जबाब यांचाही समावेश आम्ही करत होतो. याबरोबरीने  मैफिलीच्या उत्तरार्धात प्रेक्षकांचा अंदाज घेऊन रागसंगीतावर आधारित ‘वैष्णव जन’ हे भजन आणि अन्य लोकप्रिय गीते सादर केली. म्हणजे साखर लावलेली गोळी जशी देतात तसे काहीसे!

आमच्या वादनातून श्रोत्यांना उच्च प्रतीचा संगीतानंद मिळावा असा आमचा प्रयत्न होता. वादन रंजकही असले पाहिजे हे आमच्या आधीच्या दौऱ्यातील अनुभवातून आम्ही शिकलो होतो. अनेक वर्षांपूर्वी सुप्रसिद्ध गायिका वीणाताई सहस्रबुद्धे यांचे मैफिलीचा आकृतिबंध कसा असावा यासंबंधी व्याख्यान ऐकले  होते. यातले विचार सर्वांना मार्गदर्शक आहेत. आम्हाला मिळालेल्या उत्तम प्रतिसादामुळे भारतीय संगीताची महानता पुन्हा एकदा अधोरेखित झाली. शास्त्रीय संगीताचे संस्कार झाले नसले तरीही हे संगीत श्रोत्यांच्या मनावर अतिशय चांगला परिणाम करते. आम्हाला आमच्या गुरूंकडून मिळालेली तालीम आणि आपल्याकडे जे आहे त्याची सुयोग्य मांडणी यांचा समतोल साधल्याने मैफिली रंगल्या. “प्रत्येक क्षण आनंदाचा गेला” असाही अभिप्राय मिळाला. मैफिलीच्या दरम्यान सतारीवरचा थाट बदलताना जो वेळ मिळत असे त्या वेळात भारतीय संगीत, रागदारी, सतारवादन, तबल्याचे योगदान, कलाकाराचा रियाज अशा अनेक मुद्द्यांवर मी मराठी, हिन्दी, व इंग्रजी भाषांमधून निवेदन करीत असे. ‘तुमच्या निवेदानाने आम्हाला वादनाचा आनंद अधिक चांगल्या रीतीने घेता आला’ असे अनेकांनी मला नंतर येऊन आवर्जुन सांगितले. सुयोग्य शब्दांत संगीत विषय समजावून देण्याचा वस्तुपाठ गुरु पं. सुरेश तळवलकर, पं. सत्यशील देशपांडे  ज्यांच्या पुस्तकातून आणि भाषणातून मला मिळाला.

**‘तब भी बोला’**

या दौऱ्यात तीन ठिकाणी तबला या प्रगल्भ तालवाद्याची ओळख करून देणारा माझा “तब भी बोला” हा कार्यक्रम मी सादर केला. ताल या संकल्पनेने भारतीय संगीताला शिस्त, कुंपण आणि आवर्तन यांची देणगी दिली आहे. साथसंगत आणि एकल वादन (सोलो) असे दोन्ही समर्थपणे करू शकणाऱ्या तबल्याचे कलात्मक पैलू या प्रात्यक्षिकातून उलगडले जातात. फक्त भारतीय संगीतात असलेल्या आवर्तनात सम आणि मुखडा या संकल्पना ही विशेष आहेत. साथीला असलेला तबला गाण्याची रंगत कशी वाढवतो हे विविध प्रकारच्या गाण्यांची साथ ऐकून श्रोत्यांना उमगते. दादरा, केरवा, भजनी धुमाळी यांचे विविध ठेके वाजवून गाण्याचा आशय कसा अधिक चांगल्या रीतीने व्यक्त होतो ते श्रोत्यांना समजते. दुसऱ्या भागात तबल्याला स्वत:ची भाषा आणि साहित्य आहे आणि ते समृद्ध आहे. वादन कसे केले जाते म्हणजे बोलांचा निकास स्पष्ट करताना तबल्यातील ‘धा, धिन’, अशी अमूर्त अक्षरे कशी वाजतात, या अक्षरांचे ‘धागे, तिट’ असे शब्द होतात, या शब्दांची ‘ धाधा तीट, धा धा तीना’ अशी वाक्ये आणि अशा वाक्याचे नंतर पेशकार, कायदा, रेला असे प्रकार (फॉर्म्स) कसे होतात हे एकल वादनाच्या प्रात्यक्षिकातून स्पष्ट होते. ‘तब भी बोला’ चे मी देश-विदेशात अनेक ठिकाणी कार्यक्रम करून भारतीय संगीताची ओळख करून दिली आहे. आलेले रसिक आणि विद्यार्थी किती मुरलेले आहेत यानुसार मी मांडणी करतो.


तब भी बोला@ॲटलांटा

**अमेरिकन जीवन शैली**

करोना काळापासून घरून काम करायचे मॉडेल असल्याने बहुतेक जण चार दिवस तरी घरीच असतात. काही जॉब तर पूर्ण वेळ ‘रिमोट’ म्हणजे ऑफिस मध्ये जायचे नाही असे आहेत. आम्ही ज्यांच्याकडे राहिलो ते १५-२० वर्षांपेक्षा अधिक काळ अमेरिकेत असल्याने स्थिरावले आहेत. त्यामुळे मुख्य शहरापासून थोड्या लांब अंतरावर (पाऊण ते एक तास) स्वतंत्र घरे असलेल्या कॉलनीमध्ये (याला तिथे सबडिव्हिजन म्हणतात) यांचे बंगले असतात. घरकर्जावरील (मॉर्टगेज) व्याजदर कमी आणि कर्ज दीर्घ मुदतीचे असल्याने आणि दोघेही नोकरी करत असल्याने थोड्या काळातही स्वत:चे घर घेणे त्यांना शक्य होते. बंगलेही प्रशस्त. त्यात मोठे हॉल/लिव्हिंग रूम, (दोन ते पाच) बेडरूम्स, २/३ कार्सचे गॅरेज, पर्सनल जिम, होम थिएटर, बार इत्यादीने सुसज्ज तळघर, बाजूला बाग, लॉन, आणि (कुटुंबाचा भाग असलेले भु-भू) असा थाट असतो. सर्व शहरामधल्या घरांचे ले-आऊट आणि आतल्या रचनेतही खूप फरक नसतो. अनेक गावांमध्ये घराला कुंपण

घालण्यावर बंदी असल्याने सलग हिरवीगार लॉन बघायला मिळते. बंगल्याच्या तळघरात ५०-६० माणसे व्यवस्थित बसून कार्यक्रम बघू शकतात. पर्सनल जिम नसला तरी घरात ट्रेड मिल/व्यायामाची सायकल हमखास असते. मुलांकरता बास्केट बॉलच्या प्रॅक्टिस साठी घराबाहेर बास्केट लावलेला पोल असतो. पियानो ही बहुधा असतोच. पण नोकर-चाकर नसल्याने हे या सगळ्यांची स्वच्छता आणि दुरुस्ती हे सर्व घरातल्या माणसानीच सांभाळायचे असते. अमेरिकेत १६ वर्षे पूर्ण झाली की कार चालवता येत असल्याने शाळेतली मुलेही कार घेऊन शाळेत येतात. पण गंमत म्हणजे मोटर बाईक चालवण्याकरता १८ वर्षे वय असावे लागते! गंमत म्हणजे आपल्या कारने किंवा विमानानेच मंडळी प्रवास करत असल्याने आमच्या कित्येक ओळखीच्या लोकांनी बस किंवा रेल्वेने आजिबात प्रवास केलेला नाही! (आपल्याकडेही आता तसेच आहे!)

आमच्या दौऱ्याचा उद्देश मैफिली करणे हा असल्याने सगळा भर कार्यक्रम आणि रियाज यावर होता. त्यांनाच प्राधान्य दिल्यामुळे आम्ही साईट सीइंग फारसे केले नाही. मला शॉपिंगची फारशी आवड नाही आणि त्याकरता वेळही नसल्याने खरेदी केली नाही, पण उत्सुकता म्हणून काही मॉल्स बघितले. माझा लॅपटॉप मी नेला असल्याने माझ्या म्युच्युअल फंड व्यवसायाचे कामही मला चांगले करता आले.

## नाटक आणि संगीत नाटक

अमेरिकेमध्येही मराठी नाटक लोकप्रिय आहे. महाराष्ट्रातली अनेक नाटक मंडळी तिथे जाऊन तेथील महाराष्ट्र मंडळातर्फे चेन बुकिंग करून कार्यक्रम करतातच पण महाराष्ट मंडळातर्फे अमेरिकन मराठी नाटके बसवतात. आम्ही तेथे असतानाच नॉर्थ कॅरोलिनाच्या कॅरी या गावामध्ये सतीश आळेकरांची 'ठकीचे लग्न' ही एकांकिका तौर्य प्रतिष्ठान ने सादर करून नंतर त्यावर चर्चाही घडवून आणली. तिथेच संगीत वस्त्रहरण नाटकाच्या तालमी जोरात चालू होत्या. असे मोठे नाटकसुद्धा ही मंडळी मनापासून तालमी करून बसवत होती. कोलंबसमध्ये तर तरुण मंडळींनी संगीत ययाती देवयानी हे वि. वा. शिरवाडकरांचे नाटक सर्व गाण्यांसह रंगमंचावर आणलेलं आहे. दूर अंतर असलेल्या तीन शहरामधल्या उत्साही मंडळीनी शनिवार-रविवार एकत्र येऊन पूर्ण दिवस तालमी करून या नाटकाचे शिवधनुष्य छान पेलले आहे. अमेरिकेतील इतर शहरात ते त्याचे प्रयोगही करत आहेत. नाटकाचा तरुण दिग्दर्शक आणि हार्मोनियम वादक शिबी लिखिते आणि नाटकात देवयानीची भूमिका करणारी सायली धर्माधिकारी (आमच्या कार्यक्रमाची निवेदिका) यांची आमच्या कोलंबसंधील कार्यक्रमात भेट झाली.

## पक्षी छायाचित्रण

अमेरिकेतील गावांमध्ये असलेले पार्क सुद्धा आपल्या कुठल्याही पार्कपेक्षा विस्ताराने अनेक पट मोठे आहेत. त्यामुळे एका फेरीत थोड्याच भागाचा फेरफटका शक्य होई. खूप उंच वृक्ष, दाट झाडी आणि भरपूर पाणी असलेले मोठे तलाव हे सगळीकडेच बघायला मिळाले. आपल्यासारखे खायचे-प्यायचे स्टॉल किंवा हातगाड्या नसल्याने स्वच्छता असते. पक्ष्यांचे वैविध्य आहे, पण अनेकदा गर्द झाडीत पक्षी लपल्यामुळे फोटो काढता येत नाहीत आणि आवाज ऐकण्यावर समाधान मानावे लागते. मला कमीत कमी समान घ्यायचे असल्याने नेहमीच्या डीएसएलआर कॅमेरा आणि मोठे लेन्स याऐवजी निकॉनचा ब्रिज कॅमेरा घेतला होता. वेळ मिळेल तेंव्हा मी पक्ष्यांचे फोटो काढण्याकरता बाहेर पडत असे. सुदैवाने सर्वच गावात मला ही संधी मिळाली. बरेच पक्षी पहिल्यांदाच बघायला (लायफर) मिळाले. बंगल्याच्या आवारात उभे राहूनही हरिण व ससे आणि झाडांवरच्या सुतार (वूडपेकर), अमेरिकन रॉबिन आणि फिंच यासारख्या पक्ष्यांचे फोटो काढता आले. मॉकिंग बर्ड आणि कार्डीनल हे पक्षी तर घराच्या आसपास बसून मस्त गातात.

(पक्ष्यांचे *फोटो बघण्याकरता या लिंक क्लिक करा:*

*कॅरि(एन सी)* - *https://photos.app.goo.gl/gCEdqSZTiGRQPx839*

*कोलंबस, क्वाड सीटी* - *https://photos.app.goo.gl/pDAZjkLX89zraZx3A*

*अटलांटा* - *https://photos.app.goo.gl/8xvXqbX75z7sDFq3A*

*हयुस्टन* - *https://photos.app.goo.gl/r37bcRypH7jocGz38* )

**पंडित मैत्री**

सुमारे दोन महिन्यांच्या आमच्या 'संगीत दौऱ्याचे ' श्रेय आमचे नातेवाईक आणि मित्रमंडळी यांना जाते. अत्यंत प्रेमाने आणि मनापासून त्यांनी आमचे कार्यक्रम आयोजित तर केलेच, पण त्याबरोबरीने आपल्या प्रशस्त घरांमध्ये आमची राहायची उत्तम व्यवस्था केली मी ऋजुता दिवेकर यांचा फॉलोअर असल्याने वाटेल तेंव्हा किचनमध्ये जाऊन खाण्या/ (चहा/कॉफी/ज्यूस!) पिण्याची मला मुभा होती. मी दोन ठिकाणी आंब्याचा शिरा करून माझ्या (किंचित) पाककलेचे प्रात्यक्षिकही दिले! युरोपमधली घरे लहान आणि एकमेकांना लागून असल्याने तिथे ठराविक वेळीच वादनाची प्रॅक्टिस करता येते. पण अमेरिकेत मात्र दिवसा/रात्री आवश्यकतेनुसार केंव्हाही आम्ही रियाज करत असू. "आम्हाला किती छान/ प्रसन्न वाटतंय", "आम्ही राजमहालात आहोत आणि दरबारी कलाकार आपली कला आम्हाला ऐकवत आहेत, असं फिलिंग येतंय" अशा प्रतिक्रिया ऐकून आमचा उत्साह वाढत असे. 'माझ्या लहानपणी मोठे कलाकार आमच्या घरी यायचे. तुम्हीसुद्धा तसेच आमच्या घरी राहिल्यामुळे मला त्यांची आठवण झाली." हे निशा बेहेरेची प्रतिक्रिया आणि

बोस्टनच्या अरुणमामांनी दिलेली ‘तुझा तबला किती गोड वाजतोय’ ही दाद सुखावून गेली. (या पूर्वी फक्त गाणाऱ्याचा आवाज गोड आहे हे ऐकले होते,) कार्यक्रमांच्या स्थळी आणि दुसऱ्या गावांनाही त्यांच्या एसयूव्हीतून केलेला प्रवास अत्यंत सुखकर झाला. आमच्यासाठी पाच-सहा तासांचे ड्रायविंगही या मंडळीनी आनंदाने केले.

*“केल्याने देशाटन, पंडित मैत्री, सभेत संचार ।*

*शास्त्रग्रंथविलोकत, मनुजा चातुर्य येतसे फार”*

मोरोपंतांची ही उक्ती मला नुसतीच पटली आहे असे नाही तर लाभदायीपण ठरली आहे. या आधी अनेक गावे आणि देश फिरून आपल्या क्षेत्रात कर्तबगार असलेल्या पंडितांची अनुकरणीय उद्यमशील कार्यशैली जवळून अभ्यासता आली आहे. या दौऱ्यातही ज्या ३०-३५ मराठी कुटुंबांशी आमचा परिचय झाला त्यांची रहाणी जवळून बघता आली. सकाळी लवकर उठून, कंपनीच्या आणि घरच्या कामाची नियोजनबद्ध आखणी करून त्याप्रमाणे हे लोक कामे करतात आणि वीकएंडला ट्रीपही एंजॉय करतात. संध्याकाळी लवकर जेवतात. पण नोकर माणसे नसल्याने सर्व वयाच्या लोकांना स्वत:लाच सर्व कामे करावी लागतात. प्लम्बर, सुतार, इलेक्ट्रिशियन, पेंटर, यांच्या सेवा महाग असल्याने D.I.Y. (do it yourself) पद्धतीने म्हणजे स्वत:च सगळी कौशल्ये आत्मसात करून आवश्यक समान विकत आणून घरच्या घरीच करण्यावर भर असतो. वॉलमार्ट, टार्गेट, होम डेपो, सॅम्स क्लब या सारख्या मॉल्स मध्ये सर्व सामानही उपलब्ध असते.

## ग्रेट आणि ऑसम!

या दौऱ्यात प्रकर्षाने जाणवलेली बाब म्हणजे तिथली भव्यता आणि संपन्नता. इथले स्केल अफाट आहे. आणि साध्या-साध्या गोष्टीविषयीसुद्धा ‘गेट किंवा ऑसम’ असे वारंवार (उगाचच?) बोलले जाते. परंतु जगावर अनेक वर्षे दादागिरी करणाऱ्या या देशाची स्थिती पूर्वी एवढी भक्कम नाही. निर्वासितांची समस्या आहे आणि कर्जाचा बोजाही वाढतोय. एकूण कर्ज त्यांच्या जीडीपी च्या १२०% आहे. (भारताचे ६९% आहे.) अमेरिकन नागरिकांचे दरडोई (per capita income) वार्षिक उत्पन्न तब्बल ८०,००० डॉलर्स आहे. त्या तुलनेत भारतीय नागरिकांचे दरडोई उत्पन्न फक्त ३,००० डॉलर्स आहे. म्हणजे अमेरिकेचा विकासदर जरी २% असला तरी त्याने १,६०० डॉलर्सची भर पडते. आणि आपला विकासदर जरी ७% असला तरी त्यामुळे वर्षाला फक्त २१ डॉलर्सची भर पडते. ही तफावत प्रचंड आहे आणि वाढतच जाणार आहे. त्यामुळे “दिल्ली तो बहुतही दूर है!!” म्हणजे आपल्याला फारच मोठी मजल गाठायची आहे, हे लक्षात येते.

निसर्गाची जपणूक आणि विकासातून मिळणाऱ्या सुविधा, यांचा समतोल अमेरिकेत आपल्यापेक्षा जास्त प्रमाणात साधला गेला आहे. आपल्या एक तृतीयांश लोकसंख्या, आणि तिप्पट आकाराचा संपन्न भूभाग, भरपूर पाणी अशा अनुकूल घटकांना योग्य धोरणे, संशोधक वृत्ती आणि कष्ट याची जोड दिल्याने त्यांना हे शक्य झाले आहे. तिथेही अनेक समस्या आहेत, मतभेद आहेतच. नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या राष्ट्राध्यक्षाच्या निवडीवरून दोन तट पडले आहेत. त्याकरता उभे राहिलेले दोन्ही उमेदवार अनेकांना पसंत नाहीत. ट्रम्प यांना भारतीयांमध्ये कमी पाठिंबा आहे पण चीन-पाकिस्तानला विरोध करण्याचे त्यांचे धोरण हे भारताच्या दृष्टीने चांगले आहे असे अनेकाना वाटते. आर्थिक मंदी (रिसेशन) येईल ही शंका काही वर्षे व्यक्त केली जात आहे. आपल्या नोकऱ्या टिकतील का याची धास्ती सर्वांच्या मनात असते. पण असे असले तरीही मे महिन्यातच येत्या सप्टेंबर मध्ये येऊ घातलेल्या गणपती उत्सवाचे नियोजन झाले आहे. त्यावेळच्या आरतीसाठी आणि प्रसादाची (जेवणाची) निमंत्रणे गेली आहेत! अनेकांच्या घरच्या गणपतीच्या कार्यक्रमाला १००-२०० मंडळी येतात यावरून त्यांचा उत्साह लक्षात येईल.

तेथील वास्तव्याच्या आणि मैफिलींच्या सुखद आठवणी घेऊन ४ जूनला रात्री आम्ही 'डेट्रॉईट-इस्तंबूल-मुंबई' परतीचा प्रवास सुरू केला. रसिकांचा प्रतिसाद आणि कौतुक हे अधिक रियाज करण्यासाठीचे 'टॉनिक' आहे असे मला वाटते. गुरूंचे आशीर्वाद आणि सर्वांचे सहकार्य यामुळेच हा दौरा शक्य झाला यात शंका नाही. जी 'गुण घेईन आवडी' या पुस्तकात मी लिहिल्याप्रमाणे,

***संगीत कलेची आस, होऊ दे जीवनाचा ध्यास***
***स्मरण गुरूंचे भरी कावडी, गुण घेईन आवडी!***

***

या दौऱ्यातल्या आमच्या कार्यक्रमांच्या क्लिपस बघण्यासाठी पुढे युट्यूब लिंक दिली आहे. (Playlist- Jyoti Thakar–Arvind Paranjape US Tour)

https://www.youtube.com/playlist?list=PL_1NrtRpYiCIpLYGoIaZenItuJ4hwv-j6

# फोटो गॅलरी

## हयुस्टन



मंजुबेन व दिनेश पटेल यांच्या घरासमोर



ज्योती कुलकर्णी, रुपाली कोठी, दिनेश पटेल



ज्योती कुलकर्णी व कुरहाटी, त्यांच्या घरासमोर



प्रेक्षकवर्ग

## ॲटलांटा



तन्वी घांग्रेकर, मिलिंद बावडेकर



ॲटलांटा महाराष्ट्र मंडळाचे सदस्य



क्लब हाऊस कार्यक्रमानंतर - रंजना दंडवते ग्रुप

# गोल्डस्बोरो/कॅरि



राजा (शिवराम) परांजपे बरोबर



बंगल्याच्या आवारातले मधमाशी पालन केंद्र



उत्सुकतेने सतार बघताना



वेन स्कूलच्या संगीत शिक्षकांबरोबर



ड्यूक्स युनिवरसिटी



चेंगप्पा यांच्याकडील कार्यक्रम - प्रेक्षकवर्ग

# बोस्टन





शाळेतला ऑर्केस्ट्रा

जुडास ट्री ,





कार्यक्रमानंतरचे भोजन

आनंद (अरूण) लेले यांच्याबरोबर





निसर्गरम्य !

# शिकागो




संगीत, सतार याविषयी निवेदन



कार्यक्रमानंतरची सेल्फी



प्रेक्षकवर्ग



आर्ट इंस्टीट्यूट—(येथे स्वामी विवेकानंदांचे भाषण झाले)



शिकागो डाउनटाउन

## क्वाड सिटी



निशा बेहेरे, प्रिया कुलकर्णी यांच्याबरोबर (शाळेच्या समोर )



सुबोध कुलकर्णी—मागे जॉन डिअरचा हार्वेस्टर



प्राथमिक शाळेतले प्रात्यक्षिक



डेबरा स्टोरी, पियानो वादक



मुग्धा, देवदत्त चितळे (कोलंबस) यांच्याबरोबर

# क्वाड सिटी

**शाळेमधल्या प्रात्यक्षिका विषयीचे अभिप्राय**

**Pleasant Valley High School Band**
43m ·

Thank you to world renowned musicians Jyoti Thankar (Sitar) and Arvind Paranjape (Tabla) from India for performing for our students today! They have performed all around the world and it was a truly unique and special performance!

You and 5 others

Like Comment Send Share



**Re: Musical Workshop** Inbox

**Anderson, Drew** 3:50 PM
to me

Thank you again for bringing them in today! I had many wonderful comments from the students this afternoon and how unique and amazing it was.

Thank you again!
Mr. Anderson

# डेट्रॉईट



**घराजवळ असलेली  एक बाग**



**बंगला सोसायटी : नेहमीचे दृश्य:  बाजूला हिरवळ असलेले मोठे (निर्मनुष्य) रस्ते.**